**आदेश निशाणी १३ वर**

**( पारीत दिनांक ०१.०४.२०२३ )**

गैरअर्जदाराने सदरचा अर्ज दिनांक १७.०२.२०२३ रोजीचा विना लेखी बयाणाचा आदेश रदद करुन गैरअर्जदाराला लेखी बयाण दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. गैरअर्जदाराने असे कथन केले आहे की, तिच्या मुलीची प्रकृती ठिक नसल्यामुळे ती वकिलांना भेटून प्रकरणाची माहिती देवू शकली नाही. तेवढयातच दिनांक १७.०२.२०२३ रोजी विना लेखी बयाणाचा आदेश पारीत झालेला होता. योग्य न्यायनिर्णयाकरीता गैरअर्जदाराला तिचे लेखी बयाण दाखल करण्याची परवानगी मिळणे आवश्यक आहे. करीता सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

३. अर्जदाराने सदर अर्जास तिव्र विरोध करुन कथन केले की, गैरअर्जदार मुददामहून सदरच्या प्रकरणात उत्तर दाखल न करुन प्रकरण लांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. गैरअर्जदाराची मुलगी आजारी असल्याबाबतचे कोणतेही वैदयकीय दस्तऐवज प्रकरणात दाखल नाहीत. करीता सदरचा अर्ज खर्चासह खारीज करण्यात यावी अशी विनंती अर्जदाराने केली आहे.

४. गैरअर्जदार व अर्जदाराचे म्हणणे ऐकले. अर्जदाराने सदरची याचिका विवाह

विच्छेदनाकरीता दाखल केलेली आहे. गैरअर्जदार दिनांक २९.११.२०२२ रोजी प्रकरणात हजर होवूनही तिने लेखी उत्तर विहीत मुदतीत दाखल केले नाही. त्यामुळे गैरअर्जदारा विरुध्द नि.क्र.१ वर विना लेखी बयाणाशिवाय प्रकरण पुढे चालविण्याचा आदेश दिनांक १७.०२.२०२३ रोजी पारीत झालेला होता. त्यानंतर गैरअर्जदाराने आज रोजी तिच्या लेखी कैफयतीसह प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची व त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास सदरची याचिका निकाली काढण्याकरीता मदतच होईल. सदरचा एकतर्फा विना लेखी उत्तराचा आदेश बाजूला सारुन गैरअर्जदाराचे लेखी उत्तर दाखल केल्यास अर्जदाराचे काहीएक नुकसान होणार नाही. करीता योग्य न्यायदानाच्या दृष्टीने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो–

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| | निशाणी १३ वरील अर्ज मंजुर करण्यात येतो. |

Digitally signed by NAJIMODDIN PATHAN
Date: 2023.04.03 11:08:40 +0530

( एन. ए. पठाण )

दिनांक ०१.०४.२०२३ २रे सह दिवाणी न्यायाधीश, (वरीष्ठ स्तर)

चंद्रपूर.